


दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
LOK AARAMBH
dainiklokaarambh@gmail.com
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

प्रतिनिधी नेमणे आहे.
बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा
९४०३६ ४१४८२
राहुल मारोतीराव वाईकर

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | रविवार १० नोव्हेंबर २०२४ | अंक ३३६ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

# ओवैसी! कोणाचा बाप आला तरी संभाजीनगरचं नाव बदलू शकत नाही - देवेंद्र फडणवीस

**मुंबई प्रतिनिधी**

महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी आज उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची संभाजीनगरमध्ये सभा झाली. या सभेत बोलताना त्यांनी ओवैसी आणि उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली. ते म्हणाले की, 'छत्रपती संभाजीनगरमध्ये महायुतीचा प्रचार करण्यासाठी एकत्र आलो आहोत. ओवैसी छत्रपती संभाजी नगर. कोणाचा बाप पैदा झाला तरी हे नाव आता बदलू शकत नाही. एमआयएमच्या सभेत एका महिलेने म्हटले. हा संभाजी राजे कोण होता. हे संभाजीनगर कसे झाले. औरंग्या फितुरी झाली नसती तर कधीच संभाजी महाराज तुझ्या हाती लागले नसते.' 'महायुतीच्या सरकारने संभाजी महाराज यांचं नाव या शहराला दिले. आता आम्ही



जागे झालो आहोत. आता व्होट जिहाद सुरु झालाय. लोकसभेच्या निवडणुकीत हे पाहायला मिळालं. योगींनी आपल्याला सांगितले बटेंग तो कटेंगे. मोदींनी ही सांगितलं की एक रहेंगे तो सेफ रहेंगे. आता भगव्याचा एकत्रित हुंकार या ठिकाणी दिसला पाहिजे. संभाजीनगर २३ तारखेला देखील भगवाच असेल हे दाखवून देण्याची ही निवडणूक आहे. काही लोकांनी भगव्यासोबत गद्दारी सुरु केली. बाळासाहेब ठाकरे यांनी या शहराला संभाजीनगर नाव दिलं. पण अलीकडच्या काळात काही नेत्यांना हिंदूहृदयसम्राट म्हणायला लाज वाटते. ही निवडणूक एकजूट दाखवण्याची निवडणूक आहे. असं ही फडणवीस म्हणाले. फडणवीस म्हणाले की, 'प्रत्येक घरात आपण आता पाणी पोचवणार आहोत. कचऱ्याची समस्या असेल किंवा रस्त्यांची अडचण असेल आपण ते सोडवले आहेत. आपण समृद्धी महामार्ग तायर केले. सेन्द्रा या ठिकाणी डीएमयसी सुरू केली आणि देशातील सगळ्या प्रमुख कंपन्या या संभाजीनगरमध्ये आणल्या आहेत. हजारो लोकांचा रोजगार आपण तयार करत आहोत. एक लाख कोटींपेक्षा जास्त गुंतवणूक संभाजीनगरमध्ये होणार आहे.'

## '11 लाख लखपती दीदी आम्ही तयार केल्या

'11 लाख लखपती दीदी आम्ही तयार केल्या आता 1 कोटी लखपती दीदी तयार करणार आहोत. लेक लाडकी योजना सुरू केली, लेक घरी आली नव्हे तर प्रत्यक्ष लक्ष्मी घरी आली असं वाटलं पाहिजे. मुलींचे मामा मंत्रालयात बसले आहेत ते मुलींच्या शिक्षणाचा खर्च आपलं सरकार करत आहे, मुलींना मोफत शिक्षण देत आहोत.' असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

'विमानतळाला आंतराष्ट्रीय दर्जा देण्यासाठी धाव पट्टी वाढवण्यासाठी 140 कोटी रुपये आपण दिले. समुद्राला वाहून जाणारे पाणी 54 टीएमसी गोदावरी पत्रात आणून मराठवाडा दुष्काळ मुक्त करणार आहोत. नवीन क्रीडा विद्यापीठ आपण स्थापन करणार आहोत, आंतराष्ट्रीय दर्जाचं स्टेडियम संभाजीनगर ला तयार होत आहे. सिडकोचे प्लॉट लीज होल्डचे फ्री होल्डचे केले आहेत. 35 हजार कुटुंबाना सिडको प्लॉटची मालकी आपण देत आहोत.'

# रस्त्यावर उभा राहून मतदारसंघांतील कामे करुन घेणार- रमेश आडसकर

**माजलगाव** दी ९ प्रतिनिधी माजलगाव मतदासंघांत आतापर्यंत रस्त्यांची, पाणीपुरवठा योजनेच्या तसेच ईतर विकासाच्या योजनांकडे लोकप्रतनिधींकडून अक्षम्य दुर्लक्ष झाले. आमदारानेच गुत्तेदारांकडून टक्केवारी घेतल्याने सर्व कामात प्रचंड



भ्रष्टाचार झाला. मला संधी मिळाल्यास सर्व विकासकामे उभा राहून करणार असल्याचे रमेश आडसकरांनी स्पष्ट केले. आज अपक्ष उमेदवार रमेश आडसकरांनी तालुक्यातील कल्याण नगर, सिद्धेश्वर नगर, मोठेवाडी, आबेगाव, बोरगाव, रोशनपुरी, नागडगाव येथे प्रचार बैठका तसेच कॉर्नर सभांना संबोधित केले या वेळी अनेक गावात रमेश आडसकरांचे ओवाळून, फटाक्यांच्या आतिषबाजीत स्वागत करण्यात आले. गावकऱ्यांनी रमेश आडसकरा समोर अनेक प्रश्न मांडले या प्रसंगी बोलताना आडसकरांनी सांगितले कि मतदारसंघातील जनतेसोबत आमदारांनी विश्वासघात केला आहे मागिल निवडणूकीत जनतेने प्रकाश सोळंकेना निवडून दिले परंतु त्यांनी जनतेच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करुन केवळ स्वतः च्या तुंबड्या भरण्याचे काम केले. मतदारसघांतील सर्वच विकासकामात टक्केवारीची नवीन भाषा सुरु झाली. रस्त्यांची,पाणीपुरवठा योजनां समवेत सर्वच विकास कामाच्या गुणवत्तेत प्रभाव पडला यामुळे रस्त्यांची चाळण झाली.



आमदार प्रकाश सोळंकेना जनता माफ करणार नसून त्यांना सन्मानपूर्वक सत्तीच्या निवृत्तीवर पाठवणार आहे. मला जनतेने संधी दिल्यास मी रस्त्यावर उभा राहून गुत्तेदारांकडून काम करुन घेणार असल्याचे आडसकरांनी सांगितले. या प्रसंगी रमेश आडसकरां सोबत मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोक डक, बाळासाहेब जाधव, बबन बप्पा सोळंके, युवा नेते तन्मय होके पाटील यांच्या सह सरपंच, उपसरपंच, सेवा सहकारी सोसायटी चेअरमन, सदस्या सहित ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# रक्ताचा तुटवडा; बळीराजा प्रतिष्ठान, रंकाळा ग्रुपकडून रक्तदान शिबीर

## बळीराम गवतेंच्या वाढदिवसाच्या निमीत्ताने उपक्रम

**बीड:** जिल्हा रूग्णायलात रक्ताचा तुटवडा निर्माण होत असून गरजूंना वेळेत रक्त मिळावे, यासाठी बळीराजा प्रतिष्ठाण आणि रंकाळा ग्रुपच्या वतीने श्री.क्षेत्र नारायण गडाचे विश्वस्त बळीराम गवते पाटील यांच्या वाढदिवसानिमीत्त रक्तदान शिबीराचे आयोजन केले आहे. या शिबीरात उपस्थित रहावे, असे अवाहन करण्यात आले आहे.



जिल्हा रूग्णालयात रूग्णांची संख्या वाढत असून याठिकाणी रक्ताची मोठी गरज निर्माण होत आहे. रूग्णालय प्रशासन आणि अनेक सामाजिक संस्था रक्तदान शिबीरे घेवून रक्तसंकलन करत असतात. परंतु आपणही समाजाचे काही देणे लागतो, अशा उदात्त हेतून बळीराजा प्रतिष्ठाण आणि रंकाळा ग्रुपने धाकटी पंढरी श्री.क्षेत्र नारायण गडाचे विश्वस्त बळीराम गवते यांच्या वाढदिवसानिमीत्त दरवर्षी प्रमाणे याही वर्षी दि.१० नोव्हेंबर रोजी बळीराजा कॉम्पेल्स, चाणक्यपुरी येथे रक्तदान शिबीर आयोजीत केले आहे. मागील अनेक वर्षांपासून रक्तदान शिबीर आयोजीत केले जात असून यावर्षी देखील या शिबीरात मोठ्या प्रमाणात मित्रमंडळी रक्तदान करणार आहे. बळीराजा प्रतिष्ठाण आणि रंकाळा ग्रुपच्या माध्यमातून रक्तदान शिबीराची जय्यत तयारी करण्यात आलेली आहे. या शिबीरात विविध क्षेत्रातील मित्रमंडळी रक्तदान करत असून आपणही रक्तदानाच्या पुण्यकर्मात सहभागी व्हावे, असे अवाहन रंकाळा ग्रुप आणि बळीराजा प्रतिष्ठानच्या

# योगेश, तुझ्याकडे उत्कृष्ट लोकप्रतिनिधी बनण्याचे गुण ना.अजितदादा पवारांकडून कौतुकाची थाप

**प्रतिनिधी बीड**

दि.९ : योगेश तुझ्याकडे उत्कृष्ट लोकप्रतिनिधी बनण्याचे गुण आहेत. लोकांच्या प्रश्नांची जाण तुला आहे. आपल्या वडीलांप्रमाणेच तू सुध्दा जनसेवेत स्वतःला वाहून घेशील, याची मला खात्री आहे, असा विश्वास उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केला. त्यांनी या संबंधी एक व्हिडिओ आपल्या स्वतःच्या अकाऊंटवरून पोस्ट करीत अशा प्रकारे डॉ.योगेश क्षीरसागर यांच्यावर कौतुकाची थाप दिल्याने राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

डॉ.योगेश क्षीरसागर हे सध्या बीड विधानसभेसाठी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या तिकिटावर उभे आहेत. एकवर्षभरापुर्वी डॉ.योगेश क्षीरसागर यांनी अजितदादा पवार यांच्या




राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करीत करीत बीडमध्ये पक्षाला उभारी देण्याचे काम केले आहे. त्यामुळेच आज पवार यांनीही बीडची जागा शिवसेनेच्या कोट्यातून सोडवून घेत डॉ.योगेश क्षीरसागर यांना इथे संधी देण्याचा निर्णय घेतला. बीड मतदारसंघात आज डॉ.योगेश क्षीरसागर यांच्यासाठी अनुकूल वातावरण आहे. उच्चशिक्षीत, फ्रेश, तरूण तडफदार चेहरा मैदानात असल्याने राष्ट्रवादीचे सर्व कार्यकर्ते देखील डॉ. योगेश क्षीरसागर यांच्यासाठी झपाटून कामाला लागलेले आहेत.

## काय आहे अजितदादांनी पोस्ट केलेल्या व्हिडिओत ?

अजितदादांना पोस्ट केलेल्या व्हिडिओत डॉ.योगेश क्षीरसागर अजितदादांविषयी बोलत आहेत. ते म्हणतात, ‼दादांचे वर्क डिसीप्लीन आहे. दिलेला शब्द पाळण्याचे काम ते करतात. त्यामुळे त्यांच्या मतदारसंघात प्रत्येक काम दर्जेदार होते. दादा त्यावर चांगल्या प्रकारे मॉनीटरिंग करतात. दादांशी आमच्या वडीलांचे पारिवारीक संबंध होते. पण मगील पाच-सात वर्षे माझी आणि त्यांच्याशी कसलीच भेट नव्हती किंवा काही बोलणे देखील नव्हते. दादा उपमुख्यमंत्री झाल्यानंतर मी त्यांना शुभेच्छा द्यायला त्यांच्या बंगल्यावर गेलो. त्यावेळी वाटले दादा आपल्याला ओळखणार नाहीत. पण नाही, दादांनी मला ओळखले. मी त्यांना म्हणालो, दादा तुमच्यासोबत काम करायला मी उत्सूक आहे. त्यांनी मला जवळ बोलावून घेतले. त्यानंतर दादांनी मला नंतर भेट म्हणून सांगितले. तिथून मी बाहेर पडलो. त्यानंतर मला माझ्या वडीलांचा फोन आला. त्यांनी मला विचारले ‼तू अजितदादांना भेटला का?फ मी म्हणालो ‼हो, पण हे तुम्हाला कोणी सांगितले?फ त्यावर वडील म्हणाले, ‼मला दादांचा फोन आला होताफ मला आश्चर्य वाटले. दादांची मी बऱ्याच वर्षानंतर भेट घेणं, तरीही दादांनी मला ओळखणं, त्यांनी माझ्या वडीलांना फोन करणं, त्यांची काम करण्याची ही टेक्नीक मला फार आवडली. त्यामुळे कधीच आम्ही दादाला विसरू शकत नाहीत‼, असे डॉ.योगेश क्षीरसागर यांनी या व्हीडिओत म्हटलेले आहे. याच व्हिडिओला दादांनी ‼योगेश तुझ्याकडे उत्कृष्ट लोकप्रतिनिधी बनण्याचे गूण आहेतफ, असे कॅप्शन दिले आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
रविवार १० नोव्हेंबर २०२४
https://lokaarambh.com



# निवडकीपुरता जाहिरनामा...!

-निवडणूक मग ती ग्रामपंचायतीची असो वा विधानसभेची. एकदा तारखेची घोषणा झाली कि समस्त प्रमुख पक्ष तयारीला लागतात इच्छुक उमेदवार पक्षश्रेष्ठींचे निवडणूका म्हणजे लोकशाहीच महोत्सव. काहीजण याकडे युद्ध म्हणूनही पाहतात. प्रेमात आणि युद्धात साम, दाम, दंड, भेद सर्वकाही माफ असते त्याप्रमाणे निवडणुकांमध्ये या सर्व बाबींचा समस्त पक्षांकडून कमी अधिक प्रमाणात वापर केलाच जातो. अनेक इच्छुक उमेदवार बाशिंग बांधून तयार असताना कोणालाही न दुखावता त्यापैकी एकालाच पक्षाचे तिकीट देऊन इतरांना कसे सांभाळायचे यामध्ये पक्षश्रेष्ठींच्या अनुभवाचा कस लागतो. एखादा नेता आपल्या पक्षाशी किंवा स्थानिक जनतेशी किती प्रमाणात प्रामाणिक आहे हे खरेतर निवडणुकांची तारीख जाहीर झाल्यावरच कळते. एरव्ही शेवटच्या श्वासापर्यंत पक्षाचे काम करण्याच्या बतावण्या करणारी नेतेमंडळी पक्षाने उमेदवारी दिली नाही म्हणून एका रात्रीत पक्ष बदलायला मागेपुढे पाहत नाहीत. एखादा नेता परिसरात जगन नावाजलेला असला कि त्याला गळाला लावण्यासाठी अन्य पक्षही फासे टाकून बसलेलेच असतात. यंदा ही रस्सीखेच पाहायला मिळाली. निवडणुकांच्या तोंडावर मतदारांना आकृष्ट करण्यासाठी समस्त पक्षांकडून त्यांचे जाहीरनामे प्रसिद्ध केले जातात. ज्यामध्ये आश्वासनांचा पाऊस पाडलेला असतो. या आश्वासनांमध्ये विकासासोबत महागाई नियंत्रण, जातीय आरक्षण, शेतकऱ्यांना कर्जमाफी, तरुणांना रोजगार, महिला सबलीकरण यांसारख्या अनेकविध बाबींचा प्रामुख्याने समावेश केलेला असतो. पक्षांच्याजाहीर सभांतूनही आम्हीच कसा राज्याचा विकास घडवू शकतो, आम्हीच कसे जनतेचे तारणहार आहोत याच्या बतावण्या केल्या जातात. निवडणुका पार पडल्यानंतर सत्तेत आलेल्या पक्षाला या आश्वासनांचा सोयीस्कर विसर पडतो. मधले काही दिवस विरोधकांची उणीधुणी काढली जातात. निवडणूका जवळ आल्या कि जे!पुन्हा विकास कामांना सुरुवात होते. वर्षानुवर्षे भारतात हेच सुरु आहे. नेत्यांच्या आश्वासनांना सामान्य जनता बळी पडते. कोणताही पक्ष सत्तेवर आला तरी परिस्थितीत फारसा बदल होत नाही. निवडणूक आयोगाने गेल्या काही वर्षांत निवडणुकीनिमित्त केल्या जाणाऱ्या खर्चावर आणि पद्धतींवर बंधने आणल्यामुळे तसेच पूर्वीच्या तुलनेत आचारसंहिता अधिक कडक केल्याने निवडणूक प्रक्रियेमध्ये बऱ्यापैकी शिस्त आली आहे'; मात्र आश्वासने देण्यावर कोणतेही बंधन नसल्याने पक्षांचे फावते. वास्तविक निवडणुकांच्या तोंडावर दिल्या जाणाऱ्या आश्वासनांवरसुद्धा बंधने असायला हवीत. राजकीय पक्ष देत असलेली आश्वासने कशी पूर्ण करणार, त्यासाठी आर्थिक नियोजन कसे असणार, किती कालावधीत आश्वासनांपैकी किती बाबींची जनतेला खऱ्या अर्थाने आवश्यकता आहे, एखाद्या समाजाला आरक्षण देण्याची आश्वासने तुम्ही देत आहात तर त्या समाजाला आरक्षणाची खरंच आवश्यकता आहे का ? याविषयीचा सविस्तर लेखा जोखा प्रमुख पक्षांनी प्रशासनाकडे निवडणुकीपूर्वी प्रतिज्ञा पत्रासह सादर करणे बंधनकारक करावे. या आश्वासनांच्या पूर्तीवर नियंत्रण ठेवणारे आणि त्यांना वेळोवेळी जाणीव करून देणारे स्वतंत्र मंडळ असावे. आश्वासनांची वेळेत पूर्ती न करणाऱ्यांना दंडित करण्याचे सुद्धा प्रावधान असावे. असे काही केल्याशिवाय व्याणेकर त्यांची पूर्तता करणार, जनतेला त्यांच्या बहुमोल मताचा मोबदलामिळणार नाही.

# ती आणि मी भाग 3

*वाचक मित्र मैत्रिणींनो कथेचा भाग जसा लिहून होतो तसा लगेच मी आपल्या सर्वांच्या सेवेत हजर करत असतो. मला येणारे मेसेज वरून कळत की तुम्हाला कथा किती आवडत आहे. व मला लिखाणासाठी प्रोत्साहन मिळते. कामाच्या व्यस्ततेमुळे भाग पोस्ट करण्यास उशीर होत आहे. त्याबद्दल क्षमस्व. काल रात्री तिच्या सोबत बोलून खुपच छान वाटल जस कोणती मौल्यवान वस्तू परत सापडली. या आधी मला अस कधीच काही वाटल नव्हत काय होतय मला कळत नाही ही एक वेगळी भावना आहे. आज रविवार हक्काचा सुट्टीचा दिवस त्यामुळे कामाला जायची गडबड नाही जाग तर आली पण अंथरूणातून बाहेर निघावस वाटतच नव्हत. तसाच हात मोबाईल कडे गेला. नेट ऑन करताच तिचा WhatsApp वर मेसेज... पुढील संवाद WhatsApp वर..

ती :- hi godu good morning dear..

मी :- good morning..

ती :- मला तुला काही तरी सांगायचं आहे.

मी :- मनातले मनात, ही काय इतक्या लवकर मला प्रपोज करते की काय. “हं बोल ना”

ती :- अरे त्या दिवशी आपल बोलण अर्धवट राहील होत ते पूर्ण करायच होत..

मी :- हो बोलणा मी तर वाट पाहत होतो तू कधी बोलतेस ते मला उत्सुकता होती पण मी तस तुला काही जाणवू दिले नाही..

ती :- हो मला माहिती आहे म्हणून मला हे आज तुला सांगायच आहे. माझ मन तुझ्याकडे मोकळ करायच. तुझा संयमी स्वभाव मला खुप भावाला godu तू माझ्यासाठी खूप खास आहे.

( तिच्या आवाजात खुपच भावनिकता होती अस वाटत होत तिने मनात खूप काही साठवून ठेवले आहे. तिला व्यक्त होण्यासाठी मला निवडले आहे I am so lucky )

मी :- हेय... स्वप्न परी तू मला कधीही काहीही सांगू शकतेस बोलू शकतेस हक्काने मी पण थोडा भावनिक होऊन बोलून गेलो. ( आणि खरच आहे आमच्यात तेव्हडा तर बॉन्ड झालच होता एकमेकांना हक्काने सुखदुःख सांगू शकतोत.)

ती :- हो रे म्हणून तर तुला मी सांगत आहे आणि त्या दिवशी पण सांगतच होते की बाबा आले. आणि सांगायच राहून गेल.

मी :- hmm सांग ना मग..

ती :- तुला वेळ आहे ना? बोर नाही होणार ना?

मी :- तुझ्यासाठी वेळच वेळ आहे.

ती :- होका बघ बर कंटाळून जाशील.

मी :- नाही अस कधीच नाही होणार.

ती :- godu सहा महिन्या पुर्वी माझी आई गेली रे मला सोडून. ती माझ्या खुप जवळ होती माझी एकमेव खास मैत्रीण तिच्या नंतर माझ ऐकून घेणारं कुणीच नाही.

मी :- मी आहे ना आपोआप मी बोलून गेलो.

ती :- हो रे मला ही तेच जाणवले म्हणून तर मी तुला सांगत आहे. तू कमी वेळात माझा खूप खास मित्र झालास.

मी :- होना आणि माझी ही तुझ्या व्यतिरिक्त कोणी मैत्रीण नाही.

ती :- आश्चर्यचकित होऊन काय खर बोलतोस मला नाही हे पडत. का तुझ्यात काही डिफिकल्टी आहे. मोठ मोठ्याने हसत होती

मी :- किती लवकर विषय बदलते ही आत्ताच हळवी झाली होती आणि लगेच मूड चेंज मग तिला मी माझी कर्म कहाणी सांगितली ( आता आम्ही fb चाट वरून आम्ही कॉल वर आलो काही दिवसातच माझ्यात खुप बदल होत होते शांत बसणारा मी आता खुलत होतो आणि मला तो जाणवत ही होता. मुलींशी बोलताना लाजणारा मी तिच्या सोबत बिनधास्त तासन्तास गप्पा मारत होतो. आता कॉलवर बोलणे रोजच झाल... )

ती :- hello godu काय करत आहेस

मी :- hello काही नाही तुझ्याचं कॉलची वाट बघत होतो तू काय करत आहेस.

ती :- तुझ्याशीच बोलत आहे

मी :- होका बरं झाल सांगितल मला तर माहिती झालं नसते

ती :- बघ मी तुझ सामान्यज्ञान वाढवत आहे.

मी :- होका एका शिकवणीचे किती घेता मॅडम तुम्ही

ती :- काही विद्यार्थी खुप खास असतात त्यांना मोफत असते त्यात तु एक

मी :- या उपकारासाठी कायम अपला आभारी राहील

ती :- अजून काय झालं का जेवण मी तर मस्त इडली लावली आहे आज..

मी :- होका मस्त आहे तुझ नवीन नवीन पदार्थ बनवुन खातेस मला येतात तेच करायला कधी कधी वेळ मिळत नाही.. कंटाळा येतो मला एखाद्या दिवशी

ती :- hmm अरे मला ना अस रोज काही तरी नवीन पाहिजे म्हणून तर मी नाष्ट्याला कधी पोहे कधी उपमा तर कधी शिरा मी रोज काही ना काही नवीन पदार्थ करुन करत असते. तेव्हढाच विरंगुळा. आई होती तर हातात द्यायची आता मला मला माझच कराव लागत.

मी :- स्वप्न परी शांत हो.. एक विचारू का..

ती :- हो विचार की

मी :- त्या दिवशी आपल बोलण अर्धवटच राहिले. तुला त्रास होईल म्हणून मी काही विषय काढला नाही पण आज विषय निघाला आहे म्हणुन विचारतो. काय झालं आईला..?

ती :- लिव्हर खराब झाले होते. आम्हाला जेव्हा कळलं तेव्हा वेळ निघून गेली होती. तरी बाबांनी खुप प्रयत्न केले पण काही उपयोग झाला नाही

मी :- आपल्या हातात फक्त प्रयत्न करण असतं. आणि ते आपण करतोच यश येणे न येणे याची चिंता नाही करायची जे होणार आहे ते तर अटळ आहे. पण जे दुरावलं आहे त्याची कमतरता नाही भरून निघत तेही तितकच खरं आहे.

ती :- हो रे आई मला शेवटच्या काळात म्हणायची मृत्यू हा कधी ना कधी होणारच आहे त्यामुळे त्याच्यासाठी तयार असाव अस खचून कसे चालेल आता दादा व बाबा साठी तुला खंबीर व्हाव लागेल. म्हणून मी कधीच त्यांच्या समोर आईची आठवण काढत नाही पण आईला विसरण मला तरी शक्य नाही.. ( हुंदके देत बोलत होती ) काही वेळ तिच्या हुंदक्यांना आवाज आला मग थोडा वेळ शांतता

मी :- तिला मनभरून रडू दिलं थोड्या वेळाने बोलायला सुरुवात केली. हे बघ जाणारा जातो पण आपल्यासाठी किती तरी चांगल्या आठवणी देऊन जातो. शरीराने जरी तो व्यक्ती आपल्या सोबत नसला तरी. आठवणींच्या स्वरुपात तो कायम आपल्या जीवनात अप्रत्यक्षपणे असतोच ना. आणि तुझ्या आईच्या किती तरी आठवणी तुझ्या सोबत आहेत ते अनमोल क्षण परत आठव म्हणजे तुझी आई तुला नेहमी जवळच भासेल.

ती :- कदाचित डोळे पुसत. हो रे godu मी असा कधी विचारच केला नव्हता किती छान समजवल तू. आता मी कधीच नाही रडणार. आणि अस काही वाटलच तर तू आहेस ना

मी :- मी तर आहेच तुझ्या सोबत नेहमीच

( असेच दिवसामागून दिवस जात होते आमच नातं अधिकाधिक गट्ट होत चालले होते. एकमेकांना बदल आम्ही सगळ शेअर करत होतो फक्त कोणाचे ही नाव न घेता तिने ही मला कधी कोणाचे नाव नाही विचारले आणि मी पण तिला नाही विचारले असेच होत आमच...)

एक दिवस बोलत असताना

ती:-तुलाएकविचारायचहोतं

मी :- हा विचार की त्यात परमिशन घ्यायची गरज काय

ती :- धीरगंभीर आवाजात ‘तुझ्या मते प्रेम म्हणजे काय रे’?

मी :- प्रेम म्हणजे....

क्र म शः

हा प्रश्न तिने आज अचानक का विचारला..? तिला godu आवडू लागला का..? ती त्याला प्रपोज करेल का..? Godu च यावर उत्तर काय असेल..? या प्रश्नाचे उत्तर जाणून घेण्यासाठी वाचत रहा कथा. मित्र मैत्रिणींनो कथा पूर्णपणे काल्पनिक आहे. सत्य परिस्थिती व घटनेशी काहीही सम्बन्ध नाही. तस आढळून आल्यास केवळ योगायोग समजावा. आपला अभिप्राय नक्की कळवा.

sgmule9028@gmail.com
©® सचिन कमल गणपतराव मुळे... ??
परभणी ९७६७३२३३१५

# परप्रांतीयांना मराठी भाषेचा तिरस्कार का ?

आत्ताच दोन-तीन दिवसांपूर्वी एक बातमी वाचली. मुंबई शहरात रेल्वे मध्ये पाटील नावाचे जोडपे मराठी बोलले म्हणून त्यांना पोलीस स्टेशनमध्ये बसवून जबरदस्तीने माफीनामा लिहून घेतला. त्या रेल्वे अधिकाऱ्याने रेल्वेत मराठी नही चलेंगी असे त्या जोडप्याला धमकवाले. हा मराठी भाषेचा व संपूर्ण महाराष्ट्राचा अपमान आहे. मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी आहे महाराष्ट्राची राजभाषा व बोलीभाषा ही मराठी आहे. असे असतानाही मुंबईत मराठी बोलणे हा गुन्हा आहे का? यापूर्वी अशा अनेक घटना मुंबई शहरात घडलेल्या आहेत. मराठी माणसाला घर नाकारणे, मराठी माणसाला दुय्यम दर्जा देणे. अशा बातम्या पाहून मनाला खूप वाईट वाटते व चिड पण येते. बाहेर राज्यातून आलेले हजारो, लाखो लोकांना या महाराष्ट्राने व मुंबईने आपलेसे केले, त्यांना रोजगार दिला त्यांची पोटाची खळगी भरली. एवढे सगळे असतानाही मराठी भाषेबद्दल परप्रांतीयांच्या मनात इतका तिरस्कार का? संविधानाने प्रत्येक राज्याला आपली राजभाषा दिलेली आहे व त्या राज्याचा कारभार त्याच भाषेत चालावा असे नमूद केले आहे. इतर सर्व राज्यात त्यांच्या भाषा आदराने बोलल्या जातात. मग महाराष्ट्रातच परप्रांतीय मराठीचा तिरस्कार का करता हेच कळत नाही?यापूर्वी अशा घटना घडलेल्या असतानाही यावर कुठल्याही प्रकारची ठोस कारवाई होताना दिसत नाही. राज्य सरकारने मुंबईत सर्वांना मराठी सक्तीची करावी. कोणीही मराठीचा अपमान केल्यास त्याला कायद्यानुसार कडक शिक्षा करावी. जेणेकरून कोणीही अमराठी व्यकती आपल्या मायबोली मराठी भाषेचा अपमान करण्याची हिम्मत करणार नाही.

उल्हास सुधीर देशपांडे
छत्रपती संभाजीनगर

# शाळकरी विद्यार्थ्यांचा विहिरीत पडून मृत्यू : उमरा फुलमळा तांडा येथील घटना

**नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट**

नांदेड : लोहा तालुक्यातील उमरा फुलमळा तांडा येथील दिवाळीच्या सुट्टीत गावाकडे आलेल्या एका शाळकरी मुलाचा तहान लागल्याने विहिरीतील पाणी पिताना पाय घसरून पडल्याने पाण्यात बुडवून मृत्यू झाल्याची घटना दि.८ नोव्हेंबर रोजी दुपारी ३:०० वाजता घडली, दरम्यान याप्रकरणी उस्माननगर पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.उमरा गट ग्रामपंचायत अंतर्गत येणा-या फुलमळा तांडा येथील ऊसतोड कामगाराचा मुलगा कृष्णा धोंडीबा जाधव वय १३ वर्षे हा आपल्या मामाच्या गावी मुखेड तालुक्यातील बा-हाळी येथे राहुन शिक्षण घेत होता मात्र तो दिवाळीच्या सुट्टीत आपल्या गावी फुलमळा तांडा येथे आला होता. दि.८ नोव्हेंबर रोजी शुक्रवारी घरी जेवण करून आपल्या तांड्यातील मित्रासोबत तो शेताकडे गेला होता. शेतात फिरत असताना उमरा शिवारातील वसंतराव शंकरराव सिरसाट यांच्या शेतातील विहिरी जवळ कृष्णा धोंडीबा जाधव यास तहान लागल्याने तो ह्या विहिरीत पाणी पिण्यासाठी विहिरीत उतरला मात्र दुर्दैवाने



त्याचा पाय घसरून तो विहिरीत पडला ४५ फूट खोल असलेली विहिरी पाण्याने भरलेली होती. यात तो गटांगळ्या खाऊन त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला ही माहिती त्याच्या आई, वडील व नातेवाईकांना उशिराने मिळाल्याने त्यांनी शोधण्यास सुरुवात केली असता आपल्या मुलाची चप्पल विहिरीजवळ आढळून येताच नातेवाईक आई- वडिलांनी हंबरडा फोडल्याची माहिती स्थानिक नागरिकांनी उस्माननगर पोलिसांना ही दिली असता पोलीस घटनास्थळी दाखल झाले व उपस्थित नागरिकांच्या मदतीने मृतदेह विहिरीतून बाहेर काढला व पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी नांदेड येथील शासकीय दवाखान्यात पाठविले असता डॉक्टरांनी तपासणीनंतर पार्थिव नातेवाईकांना देण्यात आले दुपारी १२:३० वाजता शोकाकुल वातावरणात फुलमळा तांडा येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. मयत कृष्णाच्या पश्चात्य आई, वडील व एक लहान भाऊ आहे. अत्यंत हुशार व रूपाने गोंडस असलेल्या कृष्णाच्या अचानक जाण्याने तांड्यात व उमरा गावात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
रविवार १० नोव्हेंबर २०२४
https://lokaarambh.com



# स्व विनायक मेटे यांनी केलेल्या सामाजिक कार्याच्या परतफेडीची वेळ !

## विनायक मेटे यांच्या पश्चात बीड विधानसभेची लढाई ज्योती ताई मेटे नक्कीच जिंकतील मतदारांचा विश्वास.

## बीड मतदार संघात ज्योतीताई मेटे यांच्या प्रति जनसामान्यांतून सहानुभूतीची भावना

**बीड (प्रतिनिधी)** स्व विनायकराव मेटे यांचे कार्य संपूर्ण महाराष्ट्राला ठाऊक आहे. बीड जिल्ह्याचे सुपुत्र असलेले स्व विनायकराव मेटे यांचे सामाजिक कार्यातील योगदान केवळ अतुलणीय असे आहे. आज ते आपल्यात नसले तरी, निवडणुकीसाठी अपक्ष म्हणून उभ्या असलेल्या ज्योतीताई मेटे यांच्या पदरात मते टाकून स्व विनायकराव मेटे यांनी केलेल्या सामाजिक कार्याची परतफेड करण्याची संधी आली असल्याची भावना जनसाम ान्यांमधून जागोजागी उमटताना सध्या दिसत आहे. स्व. विनायकराव मेटे हे बीड जिल्ह्याचे असल्याचा अभिमान प्रत्येक जिल्हावासियाला आहे स्व विनायकराव मेटे यांनी आपली स्वतःची ओळख निर्माण केली, समाजामध्ये जे जे काही चांगले आहे. ते ते आणण्यासाठी त्यांनी आटोकाट प्रयत्न केले. महिलांसाठी विविध सामाजिक उपक्रम राबविण्यासोबतच , तरुण पिढीला मार्ग दाखविण्याचे आणि व्यसनांपासून दूर राहण्याचे अत्यंत मोलाचे कार्य जोपासत विविध उपक्रम स्व. विनायकराव मेटे यांनी सामाजिक भावनेने जिल्ह्यात राबविले , दरवर्षी ३१ डिसेंबरला त्यांची व्यत्तनमुक्ती राबवण्याचे सामाजिक कार्यक्रम घेऊन ते राज्यामध्ये पैटर्न निर्माण केला. लोकांच्या अडी अडचणीला धावून जाण्याचे आणि त्यांच्या सुखदुः खात सहभागी होण्याचे कार्य स्व विनायकराव मेटे सातत्याने करत होते. अनेक नेते केवळ निवणूक आली की लोकांच्या भेटीगाठी घेतात आणि त्यांच्या समस्या सोडविण्याचे दिखावा करतात स्व विनायकराव मेटे निवडणूक असो किंवा, नसो त्यांचे सामाजिक कार्यापासून आणि लोकांना मदत करण्यापासून कधीच बंद राहिले नाही. शासकीय योजनांच्या माध्यमातून गोरगरिबांना आणि निराधारांना कायमची मदत मिळावी यासाठी विनायकराव मेटे यांचे कार्य नेहमीच होते. मराठा आरक्षणासाठी त्यांनी दिलेले योगदान तर सर्वोच्च असे आहे. त्यांनी मराठा समाजाच्या आरक्षणाचा ध्यास घेतला होता. शासन दरबारी अत्यंत जबाबदारीने आणि तेवढ्याच आक्रमकपणे ते हा प्रश्न मांडत असत. मराठा समाजासाठी ते महाराष्ट्र भर फिरले, आरक्षणासाठी वाटेल ते करण्याची त्यांची तयारी होती, त्यादिवशी त्यांचा दुर्दैवी



अपघात झाला त्या दिवशी सुद्धा ते केवळ मराठा आरक्षणाच्या संदर्भातील बैठकीसाठीच चालले होते. विशेष म्हणजे बीडमध्ये मोठा कार्यक्रम आयोजित केला असतानाही ते तात्काळ मुंबईकडे रवाना झाले होते. मराठा आरक्षण आणि सामाजिक कार्यासाठी त्यांची रात्रंदिवस धावपळ या नेत्याला समाज गमावून बसला आहे. मात्र नंतर त्यांचा वारसा सक्षम पणे पुढे चालविण्याचे काम त्यांच्या पत्नी डॉ. ज्योतीताई मेटे चालवत आहेत. सध्या ज्योतीताई मेटे या अपक्ष म्हणून बीड विधानसभेची निवडणूक लढवीत आहेत, ज्योतीताई मेंटे उभा असल्याने, स्व विनायकराव मेटे यांनी जनतेसाठी केलेल्या सामाजिक कार्याची परतफेड करण्याची वेळ आली असल्याची भावना जनसामान्यात तयार झाल्याचे दिसत आहे. या मुळेच ज्योतीताई मेटे यांना जनसामान्यातून मोठा प्रतिसाद मिळताना दिसत आहे.

### ज्योतीताई मेटे यांना सामान्यांचा वाढता प्रतिसाद

स्व विनायकराव नेते यांच्यानंतर त्यांच्या कार्याची धुरा ज्योतीताई मेटे या समर्थपणे पार पाडत असताना दिसतात. आता त्या सक्रिय राजकारणातही सहभागी झाल्या आहेत. हे करत असताना त्यांनी त्यांचा स्वाभिमान मात्र जिवंत ठेवला आहे. सामान्य जनता त्यांच्या सोबत असल्याने आणि स्वतःच्या कार्यावर विश्वास असल्याने सोबतच विनायकराव मेटे यांची पुण्याई असल्याने त्या मोठ्या धैर्याने वाटचाल करीत आहेत आणि त्याला सर्वसाम ान्यांची साथ मिळताना दिसत असल्याने त्या ही लढाई नक्कीच जिंकतील असा विश्वास म तदरातून व्यक्त केला जात आहे.

### समाजासाठी विनायकराव मेटे यांचे कार्य उच्च

स्व विनायकराव मेटे यांनी उभ्या आयुष्यात धर्म, जात पात असे कधी मानले नाही. मराठा समाजाच्या आरक्षणात ते सातत्याने कार्य करीत होते मात्र त्यांनी कधीच दुसया जातीमा द्वेष केला नाही. सर्वच समाजातील तरुण त्यांच्याकडे कार्यकर्ते म्हणून वावरत असायचे. विनायकराव मेटे प्रत्येक समाजातील तरुणाला जपत नेले, त्याच्या हाताला काम दिले, त्याना व्यसनापासून मुक्त केले आणि मुख्य प्रवाहात आणण्याचे कार्य केले. त्यांचे हे कार्य राज्याच्या राजकारणात आणि मोठ्या नेत्यांमध्ये असायचा मात्र बीड जिल्ह्यात आले की ते अगदी सर्वसामान्य व्हायचे. कोणताही सामान्य माणूस जाऊन त्यांना सहजपणे भेटत असल्याने एवढा साधेपणा त्यांनी अंगीकारला होता.

# माध्यम कक्षास जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांची भेट

**बीड** दि. ०९ : बीड जिल्ह्यातील विधानसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने अपर जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात माध्यम कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या माध्यम कक्षास जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी, जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणीकरण व संनियंत्रण समितीचे अध्यक्ष अविनाश पाठक यांनी आज भेट दिली. तसेच कक्षामध्ये सुरू असलेल्या जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणीकरण व संनियंत्रण समि तीचे कामकाज, मुद्रित, इलेक्ट्रॉनिक व समाज माध्यमांच्या कामकाजांचा त्यांनी आढावा घेतला व मार्गदर्शन केले.

प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी अर्पिता



ठुबे, निवडणूक उपजिल्हाधिकारी म हेंद्रकुमार कांबळे, उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी, स्वीपचे नोडल अधिकारी ओमकार देशमुख, प्र.जिल्हा माहिती अधिकारी डॉ. श्याम टरके, तहसीलदार अविनाश शिंगटे, माध्यम कक्षातील सहायक कक्ष प्रमुखब राजश्री आचार्य, इंग्रजीच्या प्रोफेसर डॉ. संगीता ससाणे, हिंदीचे प्राध्यापक डॉ. राजेंद्र सोनवणे, उर्दूचे अनुवादक शेख मोहम्मद काजिम ोद्दीन यांच्यासह माध्यम कक्षातील सर्व कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

*****

## बीडची जनता प्रस्थापितांना कदरली; शहर अन ग्रामीण भागात

### भागवत तावरेंना प्रचंड प्रतिसाद - संचालक धनंजय गुंदेकर

**बीड (प्रतिनिधी)** गेल्या काही वर्षांपासून प्रस्थापितांना निवडून देऊन कंटाळलेल्या बीड विधानसभेतील मतदारांना यावर्षी बदल हवा आहे. आघाडी अनब युतीने एकाच घरात उमेदवारी दिल्याने दोन्ही गटाबाबत मतदारांमध्ये रोष निर्माण झालेला असून अपक्ष उमेदवार असलेले भागवत हरिहर तावरे यांच्या जहाज पक्षाला शहर अनब ग्रामीण भागात पसंती मिळत असल्याचे कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक धनंजय गुंदेकर यांनी म्हंटले आहे. बीड विधानसभा क्षेत्रातील जवळपास ६०% मतदार हा ग्रामीण भागातील आहे तर ४०% मतदार हा शहरी भागातील आहे.



या दोन्ही भागात लोकप्रियता असलेले एकमेव अपक्ष उमेदवार पत्रकार भागवत तावरे हे असून सर्व स्तरातून त्यांना पसंती मि ळत आहे. कोरोना काळातील काम अनब वैचारिक प्रगल्भता असलेल्या तावरे यांना सुशिक्षित मतदार अनब गोरगरीब जनता आपलेसे करताना दिसत आहे. यावेळी तावरे यांच्या रूपाने उच्च शिक्षित आमदार बीड विधानसभेस लाभेल असे प्रसिध्दी पत्रकाद्वारे धनंजय गुंदेकर यांनी म्हंटले आहे.

## मतदानाचा हक्क बजावताना शाळा, आरोग्य, पिण्याचे पाणी, रस्ते , स्मशानभूमी आदी मुलभूत सुविधांसाठी उमेदवारांना जाब विचारावा:- डॉ.गणेश ढवळे

**लिंबागणेश:-** ( दि.९ ) विकसित भारतासाठी मतदान हे आवश्यक असुन मतदान जनजागृती काळाची गरज असुन महाराष्ट्र राज्य विधानसभा निवडणुक २०२४ निमित्ताने ङ्ग उत्सव निवडणुकीचा, अभिमान महाराष्ट्राचाङ्क या महाराष्ट्र शासनाच्या विशेष अभियानात सहभागी व्हावे यासाठी सर्वच मतदारांनी आवर्जून मतदान करावे.ग्रामस्थांनी मतदान प्रक्रियेतील महत्व आणि त्यांचा सहभाग वाढविण्यासाठी मताचा टक्का वाढवा आणि मतदान आपला अधिकार आणि आपली जबाबदारी असुन याची जाणीव मतदारांना व्हावी.लोकशाहीच्या उत्सवात सहभागी व्हावे यासाठी बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील ग्रामस्थांनी गावच्या मुख्य प्रवेशद्वारावर बॅनर लाऊन मतदानाचा हक्क बजावा आणि हक्क बजावताना शाळा, आरोग्य, पिण्याचे पाणी, रस्ते, स्म शानभूमी सारख्या मुलभूत सुविधांसाठी मतदान मागण्यासाठी येणा□या उम ेदवारांना जाब विचारावा आणि.धर्म, जात पात,लिंग,भेद, विसरून मुलभूत सुविधांसाठी निर्भयपणे मतदान करावे असे आवाहन करण्यात आले. याचे आयोजन सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केले आहे.

धर्म,जात पात,लिंग भेद विसरून शाळा , आरोग्य, पिण्याचे पाणी, रस्ते, स्म शानभूमी आदी.मूलभुत सुविधांसाठी उमेदवारांना जाब विचारावा:- डॉ.गणेश ढवळे

--मतदान आपला अधिकार आणि आपली जबाबदारी याची जाणीव ठेवून मतदान करताना निकोप आणि सुद्रढ लोकशाहीसाठी धर्म,जात पात,लिंग भेद विसरून आपल्या गावातील जिल्हा परिषदेच्या शाळा, आरोग्य, पिण्याचे




पाणी, रस्ते आणि स्मशानभूमी सारख्या मुलभूत प्रश्नांच्या अनुषंगाने मतदान म ागण्यासाठी येणा-या उमेदवारांना जाब विचारावा आणि निर्भयपणे मतदान करावे असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी केले.

## बीड विधानसभा मतदारसंघात गृह मतदानाला आजपासून सुरुवात

बीड, दिनांक 09 : बीड विधानसभा मतदार संघात आज सकाळी 07 वाजेपासून 85 वर्षांवरील, दिव्यांग असलेल्या पात्र मतदारांच्या घरी जाऊन टपाल मतपत्रिकाद्वारे मतदान (गृह मतदान) घेण्यास सुरुवात झाली आहे. या मतदार संघात असे एकूण 307 पात्र मतदार आहेत. सदरील मतदान उद्या, रविवारी (ता. 10) सायंकाळी 05 वाजेपर्यंत घेण्यात येईल. यासाठी एकूण 22 पथके नेमले आहेत, असे बीड विधानसभेच्या निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी कळवले आहे.

***

# रिपाइं पूर्ण ताकदीने डॉ.योगेश क्षीरसागरांच्या पाठीशी

## रिपाइंचे युवा प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांची ग्वाही; क्षीरसागरांची रिपाइं कार्यालयास भेट

**बीड (प्रतिनिधी)**

दि.९ : बीड विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, भाजप, रिपाइं महायुतीचे उमेदवार डॉ.योगेश क्षीरसागर यांनी रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडियाच्या (आठवले गट) कार्यालयास शनिवारी (दि.१५) भेट देवून युवा प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांच्याशी चर्चा केली. यावेळी युवक प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्त्यांची बैठक झाली. या बैठकीत महायुतीचे उमेदवार डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या पाठीशी ताकद उभी करण्याचा निर्णय घेण्यात आला.

महायुतीचा प्रमुख घटक पक्ष म्हणून रिपाइं पूर्ण ताकदीनिशी डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या पाठीशी उभी राहिल्याने डॉ.योगेश क्षीरसागर यांचे पारडे जड झाले आहे. या बैठकीस महायुतीचे उमेदवार डॉ.योगेश क्षीरसागर, रिपाइंचे युवा प्रदेशाध्यक्ष तथा जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे, राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे, अल्पसंख्यांक सेलचे जिल्हाध्यक्ष इकबाल शेख यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी जैतुल्ला खान, नसीर अन्सारी, नगरसेवक प्रेम चांदणे, अशोक वाघमारे, आर.पी. आय.चे जिल्हा सरचिटणीस राजू जोगदंड, तालुकाध्यक्ष किसन तांगडे, युवक जिल्हाध्यक्ष महेश आठवले, युवक तालुकाध्यक्ष सुभाष तांगडे, शहराध्यक्ष अविनाश जोगदंड, युवक शहराध्यक्ष भैय्या मस्के, महेंद्र वडमारे, धम्मा पारवे, बापू पवार आदी उपस्थित होते. प्रभाकर चांदणे, मायाताई मिसळे, नवनाथ डोळस, राजाभाऊ वक्ते, भास्कर जावळे, मच्छिंद्र निकाळजे, रामेश्वर खळगे, दयानंद उबाळे, नामदेव वाघमारे, भिमराव घोडराव, अविनाश जोगदंड, विजय ओव्हाळ, श्रीमंत जाधव, कैलास जोगदंड, प्रा.आनंद मोरे, भैय्यासाहेब मस्के यांच्यासह रिपाइंच्या जिल्हा कार्यकारणीचे सर्व पदाधिकारी, सदस्य, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




### डॉ.योगेश क्षीरसागर यांनी मानले आभार

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, भाजप, शिवसेना, रिपाइं., एस.आर.पी. व मित्रपक्षांच्या महायुतीचा बीड विधानसभेचा अधिकृत उमेदवार म्हणून रिपाइंचे युवक प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांनी मला जाहीर पाठींबा दिला. याबद्दल मी त्यांचे व त्यांच्या सहकाऱ्यांसह आर.पी.आय.पक्षाचे आभार व्यक्त करतो, अशी प्रतिक्रिया डॉ.योगेश क्षीरसागर यांनी व्यक्त केली.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
रविवार १० नोव्हेंबर २०२४
https://lokaarambh.com



# काही लोकांच्या डोक्यात सत्ता फार लवकर गेली

## धनंजय मुंडेंच्या बालेकिल्ल्यात शरद पवारांची तोफ धडाडली

**परळी प्रतिनिधी**

महाविकास आघाडीचे उमेदवार राजेसाहेब देशमुख यांच्या प्रचारासाठी आज परळीमध्ये राष्ट्रवादी शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांची सभा पार पडली, राष्ट्रवादीत पडलेल्या फुटीनंतर शरद पवार यांची ही परळीमध्ये पहिलीच सभा होती. ते या सभेत काय बोलणार, याकडे संपूर्ण राज्याचं लक्ष लागलं होतं. या सभेत बोलताना शरद पवार यांनी मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे.

नेमकं काय म्हणाले शरद पवार?

परळीने जीवा भावाचा सहकारी दिला होता, महाराष्ट्राला वीज देण्याचं काम या परळीतून होतं







अलीकडच्या काळात परळीला काय झालं आहे ते माहीत नाही परळीत गुंडागिरी वाढली आहे. काही लोकांना राजकीय संकटाच्या काळात मदत केली होती. बीड जिल्ह्याने सर्व आमदार निवडून देण्याचं काम मला दिले होते, दुर्दैवाने आता परिस्थिती बदलली सत्ता आल्यानंतर सत्ता डोक्यात जाऊ द्यायची नाही, मात्र काहींच्या डोक्यात सत्ता फार लवकर गेली. लोकांना त्रास देणं हे कुठेतरी थांबलं पाहिजे, असं म्हणत पवार यांनी धनंजय मुंडेंवर जोरदार निशाणा साधला आहे.

पुढे बोलताना ते म्हणाले की, बीड जिल्ह्यातील गुंडागिरी थांबावी, बीड जिल्ह्यातील शेतीचे पाण्याचे प्रश्न सोडवावेत. तरुणाच्या हाताला काम देण्यासाठी तुमची शक्ती त्यांच्या पाठीशी उभी करा. पक्ष संकटात आहे, अनेक अडचणी आहेत. पक्ष फोडण्यात तीन लोक प्रामुख्याने होते, त्यात कोण लोक होते हे विसरण्याची आवश्यकता नाही, असं शरद पवार यांनी म्हटलं आहे. दरम्यान यावेळी परळीमधून महायुतीकडून धनंजय मुंडे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. तर महाविकास आघाडीकडून राजेसाहेब देशमुख निवडणुकीच्या रिंगणात आहेत. गेल्यावेळी महाविकास आघाडीकडून धनंजय मुंडे निवडणुकीच्या रिंगणात होते, त्यांनी माहयुतीच्या उमेदवार पंकजा मुंडे यांचा पराभव केला होता. राज्यातील ज्या काही प्रमुख विधानसभेच्या लढती आहे, त्यामध्ये या मतदारसंघाचा देखील समावेश होतो.

# ट्रकच्या खाली आल्याने पोलीस कर्मचाऱ्याचा मृत्यू

सिमेंट घेऊन जाणाऱ्या ट्रकला ओव्हरटेक करताना पाठीमागील टायरच्या खाली आल्याने दुचाकीस्वार पोलीस कर्मचाऱ्याचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना आज दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास शहरातील अंबिका चौकात पांगरी रोडवर घडली आहे. या घटनेने शहरात खळबळ उडाली आहे. सुनील सुंदरराव घोळवे शिवाजीनगर पोलीस ठाण्यात कर्तव्यावर होते. आज दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास ट्रक क्रमांक एम. एच. ४४ यू ९८७१ सिमेंट घेऊन अंबिका चौकातून पांगरी रोड कडे चालला होता. यावेळी मयत पोलीस कर्मचारी दुचाकी क्रमांक एम.एच. ४४ ए ए ९०७६ वरुन जात होते. यावेळी



ट्रकला ओव्हरटेक करताना अचानक ते दुचाकीवरुन पडले अन् ते ट्रकच्या पाठीमागील चाका खाली आले. सिमेंट भरलेले असल्याने डोक्यावरुन जाताच कौठी फूटून मेंदू बाहेर पडला यामुळे पोलीस कर्मचारी सुनील घोळवे यांचा जागीच मृत्यू झाला. घटना घडताच पोलीस उपाधीक्षक विश्वांभर गोल्डे यांच्यासह पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी धाव घेतली. घटनास्थळाचा पंचनामा केला. अपघात घडताच ट्रक चालक घटनास्थळावरुन फरार झाला. सदरील मयत पोलीस कर्मचारी गणवेशात असल्याने त्यांना कर्तव्यावर असताना मृत्यूने कवटाळले आहे. सुनील घोळवे हे संयमी व कर्तव्यदक्ष कर्मचारी असल्याने त्यांच्या अपघाती निधनाने बीड पोलीस दलावर दुःखाचे डोंगर कोसळले असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे. या घटने प्रकरणी बातमी लिहपर्यंत पोलिसात नोंद करण्याची प्रक्रिया सुरू होती

# कांदिवली मध्ये राष्ट्रीय समाज पक्षाच्या निवडणूक कार्यालयाचे मा.महादेवजी जानकर यांच्या हस्ते उद्घाटन



भारत कवितके मुंबई कांदिवली पश्चिम. मंगळवार दिनांक 5 नोव्हेंबर 2024 रोजी सायंकाळी 5 वाजता कांदिवली पश्चिम येथील चारकोप विधानसभा मतदारसंघाचे उमेदवार श्री. सौरभ शुक्ला जी यांच्या राष्ट्रीय समाज पक्षाच्या निवडणूक कार्यालयाचे उद्घाटन राष्ट्रीय समाज पक्षाचे संस्थापक/राष्ट्रीय अध्यक्ष माननीय महादेव जी जानकर यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. कांदिवली पश्चिम येथील इंद्रा नगर,तयबा मस्जिद,न्यू लिंक रोड,जुनी लालजी पाडा पोलिस चौकीच्या शेजारी निवडणूक कार्यालयाचे उद्घाटन संपन्न झाले.यावेळी माननीय महादेव जी जानकर यांनी कार्यालयाची रिबीन कापून कार्यालयाचे उद्घाटन करुन उमेदवार श्री.सौरभ शुक्ला जी यांच्या माननीय महादेव जी जानकर यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.यावेळी जमलेल्या कार्यकर्त्यांना निवडणूकीत जास्ती जास्त मतदारांना शिट्टी या चिन्हावर मतदान करण्यासाठी प्रवृत्त करावे.व आपल्या राष्ट्रीय समाज पक्षाचे उमेदवार सौरभ शुक्ला जी यांना निवडून आणावे,या कार्यालय उद्घाटन प्रसंगी कांदिवली पश्चिम येथील जेष्ठ पत्रकार साहित्यिक गीतकार सामाजिक कार्यकर्ता, राष्ट्रीय समाज पक्ष चारकोप कांदिवली विधानसभा अध्यक्ष भारत कवितके, महाराष्ट्र सचिव जिवाजी लेंगरे, मुंबई उपाध्यक्ष रासपा रामधारी पाल, अनिल यादव, सरिता तिवारी, रामसिंग, गुलाब यादव, सुधाकर तिवारी, विजय शुक्ला, अरविंद सिंग,माता प्रसाद तिवारी व इतर राष्ट्रीय समाज पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

काविळ
या आजारवर
कायमचा उपचार
मिळेल
तेही मोफत
संपर्क
८६६८६८२६२०




This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com